नि. दि. मु. नं.७९/२०१३

भाउसाहेब भिवाजी त्रिभुवन
वि.
शामलता मदन त्रिभुवन, वगैरे

- निशाणी १४३ खालील आदेश -
**(CNR No.MHAH170016282013)**

प्रतिवादी क्र.९ ने प्रस्तूतचा अर्ज, या न्यायालयाच्या निशाणी ५ वरील तुर्तातुर्त ताकीद अर्जावरील हुकुमाचा वादी व त्यांचेतर्फे त्यांची मुले, घरातील महिला, सुना यांनी भंग केल्याबद्दल त्यांना धरुन आणून दिवाणी तुरुंगात ठेवण्याकरीता व प्रतिवादी क्र.९ यास त्याचे हक्क अधिकाराचे संरक्षण मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र.९ चे म्हणणे असे की, वाद मिळकतीमध्ये असणा-या घराची नासधूस करुन वादी प्रतिवादी यास घराचा वापर करण्यास मज्जाव करत आहे तसेच दादागिरीची व गुंडगिरीची व हात-पाय तोडून टाकण्याची भाषा करत आहे. सदर इसमांविरुध्द मनाईचा आदेश असतांनाही प्रतिवादी यांना मिळकतीमध्ये प्रवेश करण्यापासून वादी मज्जाव करत आहे. प्रतिवादीस दावा मिळकतीमध्ये मशागत करण्यास व बाजरी पेरणी करण्यास मज्जाव करुन वादींनी तेथून हाकलून लावले आहे. त्यामुळे न्यायालयाचे मनाई हुकमाचा भंग झालेला आहे. प्रतिवादीस शेतीमधील उत्पन्नाशिवाय दुसरे साधन नाही. सबब सदर इसमांविरुध्द कायदेशीर कारवाई होवून मनाई आदेशाचा भंग करुन अवामन केल्याप्रकणी दिवाणी तुरुंगात बसविण्यात यावे तसेच योग्य ते कायदेशीर संरक्षण प्रतिवादीस देण्यात यावे अशी विनंती केली आहे.

३. प्रस्तूत अर्जास वादीने निशाणी १४३ वर त्याचे लेखी म्हणणे दिले व प्रतिवादीच्या अर्जातील प्रतिकूल कथने नाकारलेली आहेत. त्यांचे म्हणणे असे आहे की, प्रतिवादीचा अर्ज खोटा आहे व प्रतिवादीस अशा प्रकारच्या तक्रारी करण्याची सवय आहे. प्रतिवादी क्र.९ हा अहमदनगर येथे राहतो. त्यामुळे कथीत घटना घडण्याचे कारण नाही. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा. प्रतिवादी क्र.९ चा युक्तीवाद ऐकला परंतु, वादीतर्फे युक्तीवाद वारंवार संधी देवूनही न केल्याने अर्ज वादीच्या युक्तिवादाविना चालविण्यात येतो.

४. माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या रामप्यारीबाई सुखदेव डागा व अन्य विरुध्द लिलादेवी नारायणदास जखोटीया व अन्य [ २००७(४) महाराष्ट्र लॉ जर्नल २१३ ] या प्रकरणातील न्यायनिर्णयाप्रमाणे अशा प्रकारची दाद मागण्यासाठी प्रतिवादीने स्वतंत्र असा किरकोळ दिवाणी अर्ज, दिवाणी प्रक्रिया संहितेच्या क्रम ३९, नियम २अ प्रमाणे दाखल करुन त्याबाबत पुरावा देणे आवश्यक आहे.

५. उपरोक्त सर्व बाबींचा, संदर्भांकीत न्यायनिर्णयाच्या प्रकाशात काळजीपुर्वक विचार केला असता असे दिसते की, मनाई हुकूमाचा अवमान केल्याप्रकरणी एखाद्या व्यतिरीक्त दाद मागायची असल्यास त्याचा पुरावा देवून तसा स्वतंत्र असा किरकोळ अर्ज दाखल करणे आवश्यक आहे. अर्जातील कथनामध्ये नमूद केलेल्या वादीव्यतिरीक्त इतर व्यक्ती या दाव्यामध्ये पक्षकार नाहीत. निव्वळ शपथपत्रावरुन कोणत्याही पुराव्याअभावी न्यायालयीन अवमानाबाबत कोणतेही निरीक्षण नोंदविता येणार नाही. सबब मी खालील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

निशाणी १४३ कडील अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

Ambika Anand Kulkarni

Digitally signed by Ambika Anand Kulkarni
Date: 2022.10.10 17:37:04 +05'30'

राहाता (ए. ए. कुलकर्णी)
दिनांक - १०/१०/२०२२ ३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, राहाता

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | **Rahul Naval Mali** |
| Court | : | 3rd Jt Civil Judge Jr. Dn., & Judicial Magistrate F.C., Rahata. |
| Date of order | : | 10/10/2022 |
| Signed by the Presiding Officer on | : | 10/10/2022 |
| Order Uploaded on | : | 11/10/2022 |